**दहीहंडी उत्सवामध्ये १८ वर्षांखालील मुलांच्या सहभागास बंदी असणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
शासन परिपत्रक क्रमांकः PIL-२०१६/प्र.क्र.५५/का-०३
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २४ ऑगस्ट, २०१६.

<u>वाचा -</u>

१) शासन परिपत्रक़,महिला व बाल विकास विभाग, क्रमांक- PIL-२०१६/प्र.क्र.५५/का-०३ ,दिनांक २९/०६/२०१६

२) जनहित याचिका क्रमांक ५६/२०१४ या न्यायालयीन प्रकरणामध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेले दि.११.०८.२०१४ रोजीचे आदेश.

३) एस.पी.एल. क्र. ६३७१/२०१४ या न्यायालयीन प्रकरणामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले दिनांक १७.०८.२०१६ रोजीचे आदेश.

**शासन परिपत्रक :-**

शासन परिपत्रक, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक- PIL-२०१६/प्र.क्र.५५/का-०३, दिनांक २९/०६/२०१६ याद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहे.

२. दहीहंडी उत्सवाबाबत मा.उच्च न्यायालय येथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्रमांक ५६/२०१४ या न्यायालयीन प्रकरणामध्ये दहीहंडीमध्ये सहभाग घेणाऱ्या मुलांच्या वयाबाबत असणाऱ्या शासन परिपत्रकामध्ये १२ वर्षावरून १८ वर्ष असा बदल करणेबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ११.०८.२०१४ अन्वये आदेश दिले होते. तसेच, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या एस.पी.एल. क्र. ६३७१/२०१४ या न्यायालयीन प्रकरणामध्ये दिनांक १७.०८.२०१६ रोजीच्या सुनावणीअन्वये मा.उच्च न्यायालय , मुंबई यांचे आदेश कायम करण्यात आले आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने दहीहंडी उत्सवामध्ये १८ वर्षाखालील मुलांच्या सहभागास बंदी घालण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०८२४१२५६०२०९३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2016.08.24 15:57:52 +05'30'

**वि.फ.वसावे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
६. संचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.
९. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे.
१०. सर्व उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व जिल्हाधिकारी ,
१२. सर्व पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक,
१३. सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी,
१४. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
१५. निवड नस्ती / का-३